# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३०२ - २३** **दिनांक : - ०६/०९/२०२३**

## एक दिवसाच्या नवजात स्त्री जातीच्या अभ्रकाचा परित्याग करणा-या आरोपीत महिलेचा शोध घेण्यास नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

नायगाव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक २९/०८/२०२३ रोजी दुपारी १६:१० ते १७:३० वाजेच्या सुमारास चव्हाण बागेसमोर खैरकोंडा रोड पाटीलवाडी वाकीपाडा जुचंद्र नायगाव पुर्व ता वसई जि पालघर येथे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने एक दिवसाचे स्त्री जातीचे नवजात बालक रस्त्याच्या कडेला कपडयामध्ये गुंडाळुन बेवारस स्थितीमध्ये सोडुन दिल्याने सदर नवजात बालकास बालसंगोपन क्रेदं ज्युचंद्र, नायगाव पुर्व येथे दवाउपचारा करिता दाखल करुन असुन अनोळखी आरोपी विरुध्द गुन्हा नोंद क्र. I २६५/२०२३ भां.द.वि कलम- ३१७,३१८ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

वरील दाखल उपराघ प्रकरणाचे गांभीर्य व संवदेनशीलता लक्षात घेवुन वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अमंलदार यांनी नमुद गुन्हयाचा तपास प्रारंभ करुन बालकास संपुर्णताह परित्याग करण्याच्या उद्देशाने उघडयावर टाकुन देणा-या वारसांचा शोध घेण्याकरिता परिसरातील माता बालसंगोपन केंद्र, प्राथामिक आरोग्य केंद्र, खाजगी रुग्णालये,आशा सेविका,अंगणवाडी सेविका व परिसरातील माहिला यांचेकडे सखोल तपास करण्यात आला. तपासअंती गुप्तबातमीव्दारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे नवजात बालकास उघडयावर टाकुन दिलेल्या माहिला नामे प्रियंका निरंपन सिध्दार्थ वय-२३ वर्षे राहणार- रुम नं २५, कुबर चाळ, गावदेवी मंदिराजवळ, खैरकोंडा रोड पाटीलवाडी वाकीपाडा, नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर हिचा शोध घेवुन तिच्याकडे सदर गुन्हयात अनुशंगाने कौशल्यपुर्ण चौकशी केली असता तिने सदर सदरचा गुन्हा हा वर नमुद महिला आरोपीत हिने केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर, पोलीस निरीक्षक श्री अंधारे स.पो.नि.रोशन देवरे, स.पो.नि.गणेश केकान,पो.हवा.देविदास पाटील, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे,अशोक पाटील यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

**----0000----**